**प्रेसनोट** दि. 15/07/2026

**अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे कडून दिघी पोलीस स्टेशन येथील पोलीस उप निरीक्षक यांचेवर लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई केलेबाबत.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | **पुणे घटक** |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | दिघी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड आयुक्तालय |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 अन्वये. |
| तक्रारदार | पुरूष वय 42 वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्रीमती चैताली बाळासाहेब गपाट, वय 35 वर्षे, पद- पोलीस उप निरीक्षक (वर्ग- 2), पुणे, रा.ठी.रूम नंबर 1202, बी- 2, ग्रँड बे सोसायटी मांजरी, पुणे. |
| सुरवातीची लाच मागणी | 8,00,000/- (आठ लाख रूपये) लाच मागणी केली. |
| पडताळणी दरम्यान लाच मागणी | 3,00,000/- (तीन लाख रूपये) लाच मागणी केली. |
| पडताळणी दिनांक | दिनांक 15/07/2026 रोजी |
| सापळा रक्कम | 3,00,000/- (तीन लाख रूपये) |
| सापळा तारीख व वेळ | दिनांक 15/07/2026 रोजी 17.49 वा. |
| ठिकाण | दिघी पोलीस स्टेशन, दिघी, पुणे येथे |
| सापळा अधिकारी यांचे नाव व पद | श्री. सुहास हट्टेकर, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. 9881873330) |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्री. मिथुन म्हात्रे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. 9637577154) |

**थोडक्यात माहिती :-** यातील तक्रारदार यांचेविरूद्ध दिघी पोलिस स्टेशन, पिंपरी चिंचवड येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे, पी.एस.आय. चैताली गपाट ह्या त्या गुन्ह्याच्या तपास अधिकारी आहेत, पी.एस.आय. चैताली गपाट यांनी सदरचा गुन्हा 'बी' फायनल करण्यासाठी आणि गुन्ह्यात मदत केली व पुढे भविष्यात मदत करण्यासाठी यातील तक्रारदाराकडून 8,00,000/- रूपये लाचेची मागणी केली. म्हणून तक्रारदार यांनी दिनांक 14/07/2026 रोजी लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे तक्रार दिली आहे.

नमुद प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि. 15/07/26 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून लाच मागणी पडताळणी कारवाई केली असता लोकसेवक पोलीस उप निरीक्षक श्रीमती चैताली गपाट यांनी तक्रारदार यांच्याकडे तक्रादाराविरूद्ध दाखल असलेल्या गुन्ह्यात बी फायनल पाठविण्यासाठी तडजोडीअंती 3,00,000/- रूपये लाच केली मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

वर नमूद केले प्रमाणे लाच मागणी निष्पन्न झाल्यानंतर दिनांक 15/07/2026 रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान यातील आरोपी लोकसेविका चैताली गपाट, पोलीस उप निरीक्षक यांनी तक्रारदार यांचेकडून दिघी पोलीस ठाण्यात 3,00,000/- रूपये पंचासमक्ष स्वीकारले असताना त्यांना 17.49 वा. रंगेहात पकडण्यात आले आहे. दिघी पोलिस स्टेशन पुणे येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्या प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

वरील आरोपीस ताब्यात घेतले असून त्यांच्याविरूद्ध दिघी पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड आयुक्तालय येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा अधिनियम 1988 अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

**सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि. पुणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, ला.प्र.वि. पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री.शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 9823167154) तसेच अपर पोलीस अधीक्षक-1 श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि.,पुणे (मो.क्र. 9029030530) यांनी केले आहे.**

1) **अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे- दुरध्वनी क्रमांक** -020-26122134, 26132802, 26050423, **9403781064**
2) **व्हॉट्स-अॅप क्रमांक** - 9403781064 (पुणे), 9930997700 (मुंबई)
3) **ई-मेलआयडी - पुणे** dyspacbpune@mahapolice.gov.in
4) **वेबसाईट** - www.acbmaharashtra.gov.in
5) **ऑनलाईन अॅप तक्रार** - www.acbmaharashtra.net.in

(सतिश संभाजी वाळके)
सहा.पोलीस आयुक्त/पो.उप.अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे